दिनांक  01/03/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 267

विषय – विटा नगरपरिषद वाहन विभागाकडील अग्निशामक वाहन क्रं.एम.एच.10 पी 1008 साठी  होजरी पाईप खरेदी करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ-  मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 01/03/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद वाहन विभागाकडील अग्निशामक वाहन क्रं.एम.एच.10 पी 1008 साठी होजरी पाईप खरेदी करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

1) सुर्या फायर, विटा

2) अर्जुन असोसिएट, इंचलकरंजी

3) हिदूस्थान टीम ॲण्ड मार्केटींग, मिरज

उपरोक्त निविदापैकी सुर्या फायर, विटा यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 01/03/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 268

विषय – नगरपरिषदेकडील जनरेटर करीता ऑटो स्विच बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी संगणक अभियंता यांची दिनांक 01/03/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील जनरेटर करीता ऑटो स्विच बसविणे आवश्यक आहे. नगरपरिषद मधील सर्व विभागातील संगणक हे लाईट गेल्यानंतर आपोआप बंद पडत आहेत. त्यामुळे विविध विभागांत काम करणेस अडचणीचे होत आहे. तरी नगरपरिषदेकडे असलेल्या जनरेटरला ऑटो स्विच बसविल्यास संगणक आपोआप बंद पडणेची समस्या उद्भवणार नाही. सदर कामी ऑटो स्विच खरेदी करणे व बसविणे कामी अंदाजे 60 हजार रुपये पर्यंत खर्च अपेक्षित आहे. तरी नगरपरिषदेकडील जनरेटर करीता ऑटो स्विच बसविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा